साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राहूल अरूणराव मेंढूले
वय:–३५ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.सालेभट्टी, ता.भिवापूर, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटना दिनांक ०१/०३/२०२४ रोजीची सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास घडली आहे. सदर दिवशी मी जेव्हा ट्रॅक्टरमधून कडबा उचलत होतो तेव्हा आरोपी अनिल हा मला म्हणाला की, भावाकडुन का बोलतो असे म्हणुन त्याने मला डोक्यावर डाव्या बाजुने काडी मारली. सदर काडी मारल्यामुळे मला लागले व त्यामुळे चार टाके पडले. त्यामुळे रक्त निघत होते. त्यानंतर आम्ही सिर्सी पो.स्टे.ला गेलो व रिपोर्ट दिली. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली ती तीच आहे त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र. १३** देण्यात आला. त्यानंतर सदर फिर्यादवरून प्रथम खबर अहवाल तयार केला होता. आता मला सदर प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.१४** देण्यात आला. त्यानंतर मी पोलिसांसोबत घटनास्थळावर गेलो होतो. आता मला तेथिल फोटो दाखविण्यात आला तो तोच आहे त्यामध्ये माझा फोटो आहे त्यास **आर्टीकल अ** देण्यात आले. पोलिसांनी माझे बयाण नोंदविले होते. ज्या आरोपीने मला मारले आहे त्याला पाहिल्यास मी ओळखतो. आरोपीकडे बोट करून आरोपी न्यायालयात हजर असल्याचे व तो तोच असल्याचे सांगितले. तसेच आरोपीने मला ज्या काडीने मारले ती दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला जी.पी.न.८४/२०२३ वरिल एक वेळवाची काठी दाखविली ती तीच आहे त्याला **एम.ओ.०१** देण्यात आला.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. श्री.आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. आरोपीचे व माझे घर आमोरासोमोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमधील सा.क्र.०५ संजय शेरकी हा आरोपीचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व त्याच्या भावाचा शेतीच्या करणावरून वादविवाद आहे. हे म्हणणे खरे आहे की,

संजय शेरकी हे माझ्या चांगल्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना घडण्याच्या पुर्वी आदल्या दिवशी आरोपी व त्याचा भाऊ संजय शेरकी यांचा घरगुती करणांवरून वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर वाद सोडविण्यासाठी आरोपी व त्याच्या भावाच्या मधात गेलो होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी आरोपीच्या भावाला दवाखाण्यात घेउन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी तेथे गेलो होतो त्यावेळी आरोपी मला काहीच बोलला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आरोपीने मला शिव्या दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला घटनेच्या आदल्या दिवशी शिवीगाळ केल्यावरून मी सदर शिवीगाळ का केली म्हणुन पो.स्टे.ला फिर्याद दिली नव्हती.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दुस–या दिवशी ज्यावेळी मी फिर्याद दिली त्यावेळी फिर्याद देतांना घटनेच्या आदल्या दिवशी आरोपीने मला शिवीगाळ केली याबाबत मी फिर्याद देतांना सांगितले नव्हते. असे काही नाही की, आरोपीने मला घटनेच्या आदल्या दिवशी शिवीगाळच केली नव्हती त्यामुळे मी सदर घटनेची फिर्याद देतांना आरोपीने मला सदर शिवीगाळ केल्याचे सांगितले नाही.

**४.** मी सालेभट्टी येथे राहतो. तेथुन सिर्सी पो.चौकी सहा किमी. अंतरावर आहे. माझ्या गावावरून सिर्सी पो.चौकीला मो.सायकलने जाण्यासाठी १५ ते २० मिनिटे लागतात. मी सदर घटना घडल्यानंतर सरळ सिर्सी पो.चौकी येथे गेलो होतो. सदर घटना ही सकाळी ९.०० वाजता घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेची फिर्याद ही मी दुपारी १२.०० वाजता दिल्याचे फिर्यादमध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू घटना घडण्याच्या पुर्वीपासुन आरोपीसोबत माझे पटत नाही.

**५.** जर एखाद्या ट्रॅक्टरमधुन कडबा खाली करत असेल तर खाली करतांना कडबा जमिनीवर पडतो. आता मला आर्टीकल अ वरिल फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये कडबा जमिनिवर पडल्याचे दिसत नाही तसेच ज्या ट्रॅक्टरमध्ये कडबा भरलेला होता तो ट्रॅक्टरदेखिल सदर फोटोमध्ये दिसत नाही.

**प्रश्न–**आर्टीकल अ वरिल फोटो कधी काढला होता?

**उत्तर–** जवळपास आम्ही वापस आल्यावर काढला होता.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, माझे रक्त सांडलेले कपडे पोलिसांनी जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलाही मार लागला नसल्याने माझ्या कपड्यावर माझे रक्त सांडले नव्हते त्यामुळे रक्त सांडलेले कपडे पोलिसांनी माझ्याकडुन जप्त केले नाही.

**७.** एम.ओ.०१ वरिल काडी मीच पोलिसांना दिली होती. माझ्या घराच्या आजुबाजुला म्हणजेच दक्षिणेला दौलतराव मेंढुले, समोर संजय मारोती शेरकी यांचे घर, तसेच समोर त्याच दिशेला अनिल मारोती शेरकी यांचे घर आहे. तसेच माझ्या घराच्या आजुबाजुला बरबटकर, नरूले यांची घरे आहेत. नवघरे यांचे घर तेथे नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की,माझ्या डोक्याला झालेली जखम ही मी रोडवर पडल्यामुळे झाली होती. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला कोणत्याही प्रकारची मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या भावाचे व माझे चांगले संबंध असल्यामुळे व आदल्या दिवशी आरोपीच्या व त्याच्या भावाचा वादविवाद झाल्यामुळे त्याचा वचपा काढण्यासाठी मी खोटी केस आरोपीविरूध्द दाखल केली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१२/०६/२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड